'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com


साप्ताहिक शब्दरुतूला वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
शब्दांच्या स्पर्शाने भिंतींचे आकाश बनो...
शब्दालय प्रकाशन
महाराष्ट्र शासनाचा वि.पु. भागवत व इतर अनेक नामवंत पुरस्कारप्राप्त संस्था
आपले ग्रंथालय/कॉलेज/शाळा/व्यक्तिगत पुस्तके मागवण्यासाठी आजच संपर्क करा : मो. ९०११२०१४१४

* वर्ष ३ रे * अंक २ रा * रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५(Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

**नवी कोरी पुस्तकं**




**गोतावळा**
: लेखकाचे नाव :
**श्रद्धा बेलसरे - खारकर**
किंमत रु. : २२०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**धर्म-मर्म**
: लेखकाचे नाव :
**श्रीनिवास बेलसरे**
किंमत रु. : ३००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# कर्जमुक्ती पाहिजे म्हणजे पाहिजे

## उद्धव ठाकरेंचा फडणवीसांवर 'आसूड'

**छ. संभाजीनगर :** शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, या मागणीसाठी ठाकरेंची शिवसेना आज रस्त्यावर उतरली. छत्रपती संभाजीनगरमध्ये पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी हंबरडा मोर्चा काढण्यात आला. माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे देखील मोर्चात सहभागी झाले. यावेळी उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, पंधरा दिवसांपूर्वी मी मराठवाड्यात आलो होतो. शेतकऱ्यांना भेटलो तेव्हाच मी जाहीर केलं जोपर्यंत हे सरकार कर्जमाफी करत नाही, तोपर्यंत या सरकारला आम्ही सोडणार नाही. गेल्या वेळेला आलो तेव्हा पाऊस होता, यावेळी आलो तेव्हा कडक ऊन आहे. इतर वेळेला शिवसेना तुमच्यासोबत आहेच पण ज्यावेळेस तुमच्यावर संकट येईल त्यावेळेस शिवसेना तुमच्या खांद्याला खांदा लावून सोबत आहे. हेक्टरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी शेतकऱ्यांशी बोलूनच केली आहे. सरकारने जाहीर केलेले पॅकेज शेतकऱ्यांना अमान्य आहे. सरकारचे पॅकेज ही मोठी थाप असून स्वतःचीच पाठ खाजवून घेत आहेत, थोपटून घेत आहेत, असा हल्लाबोल त्यांनी केला.



उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, पन्नास हजार रुपये हेक्टरी आपण कोणाकडे मागत आहोत तर ५० खोके ज्यांनी घेतले आहे त्यांच्याकडे मागत आहोत. त्यामुळे ते सहजासहजी वठणीवर येणार नाहीत. **(पान २ वर)**

### राजा उदार झाला आणि हातात टरबूज दिलं

कैलास तुम्ही जे म्हणालात राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला. पण आता एका क्षेत्र शेतकऱ्याने सांगितले की, साहेब हातात टरबूज दिला. मी या सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचे समर्थन करायला तयार आहे. पण माझी एक अट आहे. मुख्यमंत्री बोललेत खरडून गेलेल्या जमिनीला पर हेक्टरी मनरेगातून साडेतीन लाख रुपये देणार आहोत. तुमची नियत असेल तर दिवाळीपूर्वी तीन लाखातील एक लाख रुपये माझ्या शेतकऱ्यांच्या अकाउंटमध्ये जमा करा, असे आव्हान उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

## ट्रम्प यांनी चीनवर लादले १०० टक्के टॅरिफ

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादले १०० टक्के टॅरिफ लादले आहे. ट्रम्प यांच्याकडून सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, ट्रुथ सोशलवर एक पोस्ट करत नवीन कर जाहीर करण्यात आले आहे.अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांमधील तणाव वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे.

हा कर आधीच लागू असलेल्या शुल्कांव्यतिरिक्त असणार असल्याची माहिती मिळत आहे. अमेरिकन उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या **(पान २ वर)**

## शांतता नोबेल मारिया माचाडो यांना

**नवी दिल्ली :** यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार मारिया कोरिना माचाडो यांना जाहीर झाला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केल्यानं शांततेचा नोबेल पुरस्कार गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत होता. पण आता नॉर्वे-च्या समितीने शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर केला असून ट्रम्प यांचं स्वप्न भंगलंय.

## घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडताहेत

**मुंबई :** मला फक्त बाळासाहेब ब्रँड माहिती आहे, इतर कोणताही ब्रँड माहिती नाही, महापालिका निवडणुकीत महायुतीलाच यश मिळेल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कधी घराचा उंबरठा न ओलंडणारे आता हंबरडा फोडत आहेत. जेव्हा द्यायची वेळ होती तेव्हा

### एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका

आमचे हात रिकामे आहेत- रिकामे आहेत असंच यांचं सुरू होतं असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.



राज्यातील शेतकरी संकटात आहे, त्यांच्या डोळ्यात अश्रू आहेत, या वेळेस कोणी राजकारण करू नये असं आवाहन एकनाथ शिंदे यांनी केलं. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर जोरदार टीका केली.

उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, यांना हे उशिरा सुचलेलं शहाणपण आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधा-बांधावर आम्ही जाऊन आलो. प्रत्यक्ष जाऊन तिथली परिस्थिती आणि **(पान २ वर)**




२०२५ दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा!



आशयसंपन्न लेख, कथा आणि कविता
यांची मेजवानी घेऊन आला आहे
**शब्दालय दिवाळी अंक २०२५**
वितरण/विक्रीसाठी उपलब्ध...

**विशेष लेख**

**कितीही पुढारलो, तरी आदिबंध आदिम संस्कृतीचेच!**
मुकुंद कुळे / ४
**संस्कृतींच्या प्रवाहांचे घाट**
अंजली चिपलकट्टी / २५
**म. सयाजीरावांचा मुदबकखाना - संस्कृतिसमन्वयाची प्रयोगशाळा**
चिन्मय दामले / ३८
**आदिवासी संस्कृती व आपण**
प्राची वैद्य-दुबळे /५१
**वारसा आणि प्रवाह**
नीरजा पटवर्धन / ७६
**नास्तिकता आणि बहुसांस्कृतिकता**
अभिजित देशपांडे / ८४
**संस्कृतिसंकर आणि भारतीय दृश्यकला**
मंगेश नारायणराव काळे / ९५
**नाळ या मातीतली तुटलेली नाही**
कामिल पारखे / ११३
**संस्कृती : स्थलांतराच्या नजरेतून**
निळू दामले / १३२
**महाराष्ट्रातल्या मुद्रणतंत्राचा उदय : संस्कृतिसंकर आणि महाराष्ट्राचं समाजकारण**
नीतीन रिंढे / १३८
**गाव, गोधडी आणि गांधी**
अभिधा निफाडे / १५६
**मंदिर-मशिदींचे शहर : मालेगाव**
विनोद गोरवाडकर / १७०

**कथा**

**अमरनाथची आई**
मूळ हिंदी कथा : जितेंद्र भाटिया
अनुवाद : जयप्रकाश सावंत / १५
**रुकार**
हिनाकौसर खान / ६०
**एकाकी**
निहार सप्रे / १४६
**जिवट दोरवा**
सुचिता घोरपडे / १६२

**ललित**

**वेडी माया वाया गेली!**
मधुकर धर्मापुरीकर / ९०
**दूर का राही**
प्रतिमा कुलकर्णी / १२४
**ठेविले अनंते राहू नये तैसेची**
उदय कुलकर्णी / १५२
**मनविसाव्याचा श्रावणझोका**
सरिता सोमाणी / १७८

**कविता / १८३ ते १९९**

कल्पना दुधाळ । सुचिता खल्लाळ । नीलकंठ कदम । मनीषा उगले । सारिका उबाळे । संजय कृष्णाजी पाटील । अरुण शेवते । नम्रता फलके । संजय पाटील । लता थोरात । हर्षदा सुंठणकर । भगवान निळे । प्रशांत असनारे । व्यंकटेश चौधरी । स्वप्निल चव्हाण । तुकाराम खिल्लारे । प्रमोदकुमार अणेराव.

शब्दालय पुस्तकवारी
पुस्तकांची वारी... आपल्या दारी...

दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...
90 11 20 1414

| अंकाचे नाव | किंमत रुपये |
|---|---|
| अनुभव | २५०/- |
| आश्लेषा | २५०/- |
| अनघा | ३००/- |
| अक्षरदान | ३००/- |
| अक्षर * | ३५०/- |
| अहेर | २५०/- |
| आनंदघन | ३००/- |
| चंद्रकांत | ४००/- |
| चौफेर समाचार | ५००/- |
| दीपलक्ष्मी | ३६०/- |
| दीपावली | ३५०/- |
| अक्षरधारा | ३५०/- |
| गंधाली | ३६०/- |
| हंस | ४५०/- |
| कथाश्री | ४००/- |
| किस्त्रीम | ३००/- |
| शब्दगांधार | २५०/- |
| स्वरप्रतिभा | २५०/- |
| शब्द शिवार | ३००/- |
| व्यासपीठ | १५०/- |
| शब्दालय | ३५०/- |
| व्हाईट स्पेस | २००/- |
| चांगुलपणाची चळवळ | २००/- |
| अंतरंग | २००/- |
| आनंद तरंग | २५०/- |
| चतुरंग अन्वय | ३००/- |
| अक्षर भेट | १५०/- |
| पृथा | ३००/- |
| शब्दाई | ३००/- |
| निनाद | ३००/- |
| सारांश | २००/- |
| आवाज | ४५०/- |
| मार्मिक | १२०/- |
| दिवाळी आवाज | ३८०/- |
| धमाल धमाका | ३००/- |
| फिरकी | २००/- |
| हास्य धमाल | ३००/- |
| जत्रा | ३५०/- |
| मोहिनी | ४५०/- |
| महाराष्ट्राची जत्रा | ३००/- |
| प्रभात | २००/- |
| श्यामसुंदर | ३००/- |
| रविवारची ध. जत्रा | २५०/- |
| भन्नाट | १५०/- |
| गुंफन | २००/- |
| टिंगल टवाळी | २२०/- |
| विनोदी कथा | २२०/- |
| विनोद वल्ली | २२०/- |
| आला रे आला | २२०/- |
| हा . हा . हा | २५०/- |
| सुभाषित | २५०/- |
| सुहास्य जत्रा | ३००/- |
| हास्यानंद | २५०/- |

| | |
|---|---|
| कालनिर्णय* | ३००/- |
| ललीत | ३००/- |
| लोकमत दीपोत्सव* | ३९९/- |
| लोकसत्ता* | २००/- |
| लोकप्रभा* | ५०/- |
| मेनका | ३५०/- |
| मौज | ४००/- |
| महाराष्ट्र टाईम्स* | २००/- |
| निहार | २००/- |
| पद्मगंधा | ४००/- |
| पुरूष स्पंदन | ३००/- |
| पुरूष उवाच | २००/- |
| प्रपंच | ३५०/- |
| पुढारी * | ३००/- |
| ऋतुरंग | ३००/- |
| रागिणी | २५०/- |
| साधना | २००/- |
| केसरी | १५०/- |
| सत्याग्रही | २००/- |
| संस्कृती | ३००/- |
| मुक्त शब्द | ३५०/- |
| अक्षरलीपी | २५०/- |
| एकमेव वेगळा | २५०/- |
| अक्षर मुद्रा | २५०/- |
| अनुराधा | ३००/- |
| अलका | २७०/- |
| अनुराग | २७०/- |
| गृहलक्ष्मी | ३२०/- |
| गृहशोभिका * | ९०/- |
| माहेर | ३५०/- |
| मानिनी | ३५०/- |
| मिळून साऱ्याजणी | १००/- |
| दीर्घ कथा | २००/- |
| श्री व सौ | २००/- |
| सुवासिनी | ३००/- |
| विपुलश्री | ३५०/- |
| वसुधा | २७०/- |
| सासर माहेर | २५०/- |
| गृहशोभा | १५०/- |

| | |
|---|---|
| शिवतेज | १००/- |
| शिवस्पर्श | १००/- |
| साप्ताहिक सकाळ* | २००/- |
| सामना * | १५०/- |
| साहित्य शिवार | २००/- |
| साहित्य लोभस | १५०/- |
| संयम | १८०/- |
| उत्तम अनुवाद | ४००/- |
| वाघुर | ३५०/- |
| वसंत | ३००/- |
| वेदांतश्री | ३००/- |
| जडण घडण | २५०/- |
| चौफेर साक्षीदार | २५०/- |
| साहित्यरंजन | २५०/- |
| पद्मरत्न | ४००/- |
| मनोकल्प | ३००/- |
| साहित्य स्वानंद | १५०/- |
| मैत्र | ३००/- |
| मेहता मराठी ग्रंथ जगत | १५०/- |
| समदा | १८०/- |
| वसा | ३५०/- |
| सकाळ मनी * | १५०/- |
| एकता | २५०/- |
| अक्षर वेध | ३९५/- |
| रत्नावली | २५०/- |
| लयभारी | ३५०/- |
| अक्षरधन | २४०/- |
| सृजन संवाद | ३५०/- |
| समिधा | २००/- |
| इन साईट | २५०/- |
| ब्रह्मज्ञान | २००/- |
| भविष्य | १५०/- |
| भविष्य निर्णय | २००/- |
| धनुर्धारी | ३००/- |
| ग्रहांकित | ४००/- |
| गृहबोली | २८०/- |
| ग्रहसंकेत | २००/- |
| ज्योतिष ज्ञान | ३५०/- |
| ज्योतिष तंत्र आणि मंत्र | ३००/- |
| मंत्र तंत्र तोडगे | २५०/- |
| वार्षिक राशी भविष्य | २५०/- |
| ग्रहवेध | २५०/- |
| रेकी | २००/- |
| आनंदी वास्तू तोडगे | २२०/- |

| | |
|---|---|
| आपले छंद | ४००/- |
| अर्थवेध | ३००/- |
| चपराक | ४००/- |
| ग्राहकहित | २५०/- |
| अपेक्षा | २००/- |
| मन:शक्ती | २००/- |
| पुणे प्रतिष्ठान | २००/- |
| नरवीर | १५०/- |
| संगम | २००/- |
| हेमांगी | ३००/- |
| पुण्यभुषण | ३००/- |
| पुणे पोस्ट | १२०/- |
| ऊंसमळा | ४०/- |
| फुल टाईम पास | १००/- |
| फुल मनोरंजन | १००/- |
| उल्हास प्रभात | १००/- |
| समाज प्रतिबिंब | ३००/- |
| मिडिया वॉच | ३००/- |
| गोंदण | १५०/- |
| थिंक पॉझीटीव्ह | २५०/- |
| ॲग्रोवन* | २००/- |
| संवाद सेतू | २५०/- |
| शुभम | ३००/- |
| भवताल | ३००/- |
| आंतर भारती | ३००/- |
| कोकण मिडीया | २००/- |
| वास्तव | ३००/- |
| परन्तु | २००/- |
| प्रफुल्ल टाईमपास | १५०/- |
| फिल्मी बोलबाला | १५०/- |
| क्रांतीवीर | २००/- |
| समाजसुधारक | २००/- |
| शोध विज्ञानाचा | २००/- |
| बिईंग वुमन | २५०/- |
| आचार्य अत्रे | २५०/- |
| सँडवीच | २५०/- |
| अर्थकारण | २५०/- |
| खट्टामिटा | २२५/- |

सर्व रसिक-वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शब्दालय पुस्तकवारी
पुस्तकांची वारी... आपल्या दारी...

वरील व इतर दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...
90 11 20 1414

# मुंबई आशियातील सर्वात मोठे कनेक्टिव्हीटी हब होईल

## नरेंद्र मोदी : मुंबईतील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकार्पण

**मुंबई :** मुंबईची गेल्या अनेक वर्षापासूनची प्रतिक्षा संपुष्टात आली. आता मुंबईला दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळालं आहे. आशियातील सर्वात मोठे कनेक्टिव्हीटी हब म्हणून याची भविष्यात ओळख होईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केला. नवी मुंबई विमानतळामुळे येते गुंतवणूक वाढेल, नवे उद्योग निर्माण होतील, रोजगार निर्माण होतील. स्वप्नांना पूर्ण करण्याची इच्छाशक्ती असल्यास रिझल्टही दिसून येतात. २०१४ मध्ये मला देशवायीसांनी संधी दिली, तेव्हा माझं स्वप्न होतं, हवाई चप्पल घालणाऱ्यानेही हवाई सफर केला पाहिजे, आज ते प्रत्यक्षात होत आहे. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळासह मुंबईत अंडरग्राऊंड मेट्रोचेही लोकार्पण झाले असून विकसित भारताचं हे प्रतिक असल्याचे मोदींनी म्हटले.

बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित नवी मुंबई विम नितळाचे लोकार्पण बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे, आता लवकरच नवी मुंबईतून विमानाचे उड्डाण होणार असून डिसेंबर म हिन्यात पहिले विमान आकाशी झेप घेणार आहे. सन १९९० च्या दशकातील ह्या विमानतळाची संकल्पना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले. तर, मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात करताना, विजया दशमी, कोजागिरी आणि दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.



मोदी म्हणाले, मित्रांनो ही वेळ भारतीय युवकांसाठी असंख्या संधींचा क्षण आहे. मी महाराष्ट्रातील तरुणांना शुभेच्छा देतो, महाराष्ट्रातील लोकनेते दि.बा. पाटील यांचीही आठवण मी आज काढतो. त्यांचे सामाजिक जीवन, शेतकऱ्यांप्रती तळमळ आपल्यासाठी प्रेरणा आहे. गेल्या ११ वर्षात भारतात वेगाने विकास होत आहे, वंदे भारत रुळावरुन धावते, हायवे आणि एक्सप्रेस नव्या शहरांना जोडत आहेत, बुलेट ट्रेनचं स्वप्न वेगाने साकार होत आहे, डोंगर-दऱ्यांमधून नवे बोगदे बनत आहेत. नवी मुंबई एअरपोर्ट हे विकसित भारताचे प्रतिक आहे, याचा आकार कमळाच्या फुलासारखा असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूम ीवर बनलेला आहे.

आज भारतात विमानतळांची संख्या १६० च्या पुढे गेली आहे. जेव्हा लहान-सहान शहरात विमानतळ बनत आहेत, तेव्हा विकासाला गती मिळते. उडान योजनेंतर्गत लाखो लोकांनी हवाई प्रवास करत आपलं स्वप्न पूर्ण केलं. सध्या, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा डोमेस्टिक एविएशन मार्केट आहे. एकट्या भारतात १००० नवे विमान बनविण्याचं काम सुरू आहे. या दशकाच्या शेवटपर्यंत भारत एक नवा एमआरओ बनले. भारत आज जगातील सर्वात तरुण देश आहे, आमची ताकद आपली युवा पिढी आहे. त्यामुळेच तरुणाईला जास्तीत जास्त रोजगार देण्याचं काम आपण करत आहोत.

### १० वर्षात विमानतळांची संख्या दुप्पट

जेव्हा देशाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा देशात केवळ ७४ विमानतळ होते. गेल्या दहा वर्षांत ही संख्या दुप्पट होऊन १५० वर पोहोचली असून २०३० पर्यंत ती २२० करण्याचा संकल्प पंतप्रधान मोदींनी केला आहे. हे केवळ आकडे नाहीत, तर देशाच्या आत्मविश्वासाची कहाणी आहे. 'मोदीजी है, तो मुमकिन है' असं उगाच म्हणत नाहीत. या विमानतळाचे स्वप्न साकार करणाऱ्या सिडको आणि नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडचे जाहीर अभिनंदन केले.

**- एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

### मोदींची काँग्रेसवर टीका

राज्यात काहीजण सत्तेसाठी काम करतात, घोटाळे करुन विकासकामांना ब्रेक लावत आहेत. आज ज्या मेट्रो लाईनचे लोकार्पण झाले, ते याच लोकांच्या कामाची आठवण करुन देतो. मुंबईतील २६/११ च्या हल्ल्याचा उल्लेख करत मोदींनी काँग्रेसवर निशाणा साधला. या हल्ल्याबाबत नुकतेच तत्कालीन केंद्रीयमंत्र्यांनी काँग्रेस सरकारला उघडं पाडलं, असे म्हणत पी. चिदंबरम यांनी २६/११ च्या हल्ल्यानंतर सरकारने घेतलेल्या भूमिकेची आठवण करुन दिली. तसेच, पहलगाम हल्ल्यानंतर आपल्या सरकारने पाकिस्तानमध्ये घुसून जशास तसे प्रत्युत्तर दिल्याचेही नरेंद्र मोदी म्हणाले.

# राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना ३१ हजार कोटींची मदत

### कॅबिनेट बैठकीत ९ महत्त्वाचे निर्णय

**मुंबई :** राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३१.६२८ कोटी रुपयांचे मदतपॅकेज जाहीर केले. तर जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ३.४७ लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून, बागायती, जिरायती, जनावरांचे नुकसान, घरांचे नुकसान वासाठीही आर्थिक मदतीची तरतूद तरतूद या पैकेज मध्ये करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकरी, झोपडपट्टीवासी, उद्योग, पर्यावरण, शिक्षण, वस्त्रोद्योग व न्यायव्यवस्थेशी संबंधित महत्वाचे निर्णय घेण्यात आले. तत्पूर्वी मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीतही दोन म ोठे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार, तुकडाबंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच, एसआरए मध्ये क्लस्टर योजना राबविण्यासाठी मंजुरी दिली आहे.

राज्य सरकारने महाराष्ट्रातील छोट्या प्लॉट धारकांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. तसेच, एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबविण्यासाठी मंजूरी दिल्याने मुंबईतील झोपडपट्टीवासींनाही मोठा दिलासा मिळणार आहे. यासह, उद्योग, नगरविकास, महसूल व गृहनिर्माण विभागानेही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत एकूण ९ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

(उद्योग विभाग): महाराष्ट्र राज्याचे रत्ने व दागिने धोरण २०२५ जाहीर, सोने, चांदीचे दागिने, हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार. एक लाख कोटींरुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितेचउद्दीष्ट.

(नगर विकास विभाग) राज्यातील नागरी भागातील सांडपाण्यावर प्रक्रियेचे धोरण. सांडपाण्यावरील प्रक्रीयेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराव्दारे चक्रीय अर्थव्यवस्थेस (सर्क्युलरईकॉनॉमी) ला चालना. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार. राज्यातील ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबविण्यात येणार.

(महसूल विभाग): तुकडे बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार, अधिनियमातील कलम ८ (ब) चेपरंतुकवगळूनकलम ९ मध्ये पोट-कलम (३) नंतर परतुक समाविष्ट करण्यात येणार. (गृहनिर्माण विभाग) मुंबईत झोपडपट्टी पुनवर्सनप्राधिकरण (एसआरए) अंतर्गत झोपडपट्टीच्या पुनर्विकाससाठी समूह पुनर्विकास योजना राबविणार. (महसूल विभाग) अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृतपी. एम.ई बस योजनेअंतर्गत ई-बस डेपो व चार्जींग व्यवस्थेकरिता जागा.

# जयशंकर यांची अमेरिकेचे नियुक्त राजदूत सर्जियो यांची भेट

**नवी दिल्ली :** भारतीय निर्यातीवर ५० टक्के कर लादण्याच्या वॉशिंग्टनच्या निर्णयानंतर दोन्ही देशांमधील वाढत्या व्यापार तणावाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी शनिवारी नवी दिल्लीत अमेरिकेचे राजदूत-नियुक्त सर्जियो गोर यांची भेट घेतली. नवी दिल्लीतील पुढील अमेरिकन राजदूत म्हणून सिनेटने त्यांची पुष्टी केल्यानंतर काही दिवसांनीच गोर यांच्या सहा दिवसांच्या भारत दौऱ्यात व्यवस्थापन आणि संसाधन विभागाचे उपसचिव मायकल जे रिगास यांच्यासोबत होते.

आज नवी दिल्लीत अमेरिकेचे राजदूत-नियुक्त सर्जियो गोर यांची भेट घेऊन आनंद झाला. भारत-अमेरिका संबंध आणि त्याचे जागतिक महत्त्व यावर चर्चा केली, असे जयशंकर यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले आणि पुढे म्हटले, त्यांना त्यांच्या नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा!

# १० वी अन् १२ वीची परीक्षा फी माफ; पूरग्रस्तांसाठी सवलत

**पुणे :** राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ३४७ तालुक्यातील शेती पिकांचे, शेतजमिनीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच जनावरे दगावणे, मनुष्य हानी होणे, घराची पडझड होणे यासाठी सरकारनं मदतीचा नवीन जीआर जाहीर केला आहे.

राज्य सरकारनं ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं आहे. या पॅकेज संदर्भातील जीआर सरकारने काल जाहीर केला होता. यामध्ये राज्यातील २९ जिल्ह्यातील २५३ तालुक्यांचे नुकसान झाल्याचं सांगण्यात आलं आहे. यामध्ये काही जिल्हे वगळले होते. मात्र, मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आवाज उठवल्यांतर सरकारनं आज पुन्हा नवीन जीआर काढला आहे. यामध्ये सरकारनं राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३४७ तालुक्यांचे नुकसान झाल्याचे सांगितले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आणि १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी करण्याचा निर्णय सरकारने या नवीन जीआरमध्ये घेतला आहे.

राज्य सरकारनं जाहीर केलेल्या जीआरमध्ये दिलेल्या माहितीनुसार, जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात राज्यातील २६.६९ लाख हेक्टर क्षेत्र आणि सप्टेंबरमध्ये ३९ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे.

### शरद पवारांनी मराठ्यांचं वाटोळं केलं

**छत्रपती संभाजीनगर:** मनोज जरांगे यांनी पहिल्यांदाच शरद पवारांवर टीका केली आहे. १९९४ साली शरद पवारांनी आमच्या हक्काचं १६ टके आरक्षण ओबीसींना दिलं आणि आमचं वाटोळ केलं अशी टीका जरांगे यांनी केली. तसेच ज्या शरद पवारांनी ओबीसींना आरक्षण दिलं, त्यांचे सुद्धा उपकार ओबीसी नेत्यांनी ठेवले नसल्याची टीकाही त्यांनी केली.

# जैन मुनींकडून जनकल्याण पार्टीची घोषणा, पक्षचिन्ह कबुतर

**मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईमध्ये कबूतर खाण्याचा प्रश्न गाजतोय. या आंदोलनादरम्यान काही कबुतरांचा मृत्यू झालाय आणि त्यांच्या आत्मशांतीसाठी आज (११ ऑक्टोबर) जैन धर्मियांकडून मुंबईमध्ये धर्मसभा भरविण्यात आली होती. या धर्मसभेनंतर उपस्थित असणाऱ्या सर्व जैनमुनींनी एकत्र पत्रकार परिषद घेत मोठी घोषणा केली. आता आमची देखील संघटना असणार आहे. आम्ही महापालिकेत आमचे उमेदवार उभे करू... कबुतरांची पार्टी पाहिजे, शिवसेनेतही वाघ होता, असं म्हणत निलेश मुनींकडून जन कल्याण पार्टीची घोषणा करण्यात आली. तर धर्मसभेत मी डॉक्टरांना पण मूर्ख मानतो. एक-दोन जण मेल्यानं काय होतं?, दररोज सामान्य माणूस मरतो, त्याचा सरकार विचार करत नाही, असे वादग्रस्त वक्तव्य जैनमूनी कैवल्य रत्न महाराज यांनी केले. जैन धर्मीय लोक सर्वात जास्त टॅक्स भरतात, असे देखील जैनमुनींनी म्हटले.

मनसे नेते अविनाश अभ्यंकर म्हणाले की, याचा अर्थ तुम्ही मुंबईवर हक्क सांगणार की काय? टॅक्स भरताय म्हणजे काय? संपूर्ण देशात महाराष्ट्रातील जमीन सुपीक आहे. महाराष्ट्रातील मराठी माणूस हा मान मोडेपर्यंत इमानाने काम करतो. तो कुणालाही फसवून बँकेला बुडवून परदेशात जात नाही. तो ज्याच्याकडे काम करतो त्याच्याकडे अत्यंत इमानाने काम करतो. हे मराठी माणसाचे योगदान आहे. मराठी माणसाने अत्यंत सहिष्णूपणे इतर प्रांतीयांना इकडे जागा दिली आणि तेच आता मुंबईवर हक्क सांगण्याचा डाव करत आहेत, असे त्यांनी म्हटले.

पान १ वरून

### कर्जमुक्ती पाहिजे म्हणजे पाहिजे

तुम्हाला चाबूक हातात घ्यावा लागेल आणि यांना बरोबर वठणीवर आणावे लागेल. पॅकेज पाहिल्यावर सगळ्यांना असं वाटलं की इतिहासातलं सर्वात मोठं पॅकेज आहे. पण नाही ही इतिहासातली सर्वात मोठी थाप आहे. आजपर्यंत इतकी मोठी थाप कोणत्याही सरकारने मारलेली नाही. इतकी मोठी थाप देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मारलेली आहे. काल, परवा देशाचे पंतप्रधान मुंबईत येऊन गेले. त्यांच्या भाषणामध्ये शेतकऱ्यांबद्दल काही उल्लेख होता का? ज्या पंतप्रधानांना आपण जिथे चाललो आहोत तिथली परिस्थिती माहित नाही तर आपण त्यांच्याकडे काय न्याय मागत आहोत? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

तुम्हाला राजकारण करण्यासाठी शेतकऱ्यांची मतं हवी आहेत. शेतकऱ्यांच्या मतावर तुम्ही सरकार आणता. शेतकऱ्यांच्या मतावर तुम्ही राजकारण करतात. मग शेतकऱ्यांनी न्याय हक्क मागितला तर तुम्ही म्हणतात त्याचे राजकारण नाही. हे कुठलं सरकार आहे? कर्जाचे पुनर्गठन करणार असे सांगितले. आम्हाला हे पुनर्गठण नको आहे. आजचं मरण उद्यावर नको. आम्हाला कर्जमुक्ती पाहिजे आहे. मुख्यमंत्री बोललेत की, यांना अधिकार काय? परंतु मला अधिकार आहे. कारण मी मुख्यमंत्री असताना कर्जमुक्त करून दाखवलं होतं. सरकारला आम्ही इशारा देत आहोत जर तुम्ही कर्जमुक्त केली नाही तर आम्ही फक्त मराठवाडा नाही तर आम्ही संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी रस्त्यावर उतरवून तुमचा विरोध केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देखील उद्धव ठाकरेंनी दिला. तर कर्जमुक्ती पाहिजे म्हणजे पाहिजे, अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली.

### ट्रम्प यांनी चीनवर लादले १०० टक्के टॅरिफ

निर्यातीवर चीनने बंदी घातल्यानंतर दोन्ही देशांमधील तणाव वाढत असून याच पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांनी आता चिनी उत्पादनांवर जास्त कर लावण्याची घोषणा केली आहे.

१ नोव्हेंबर २०२५ पासून चिनी वस्तूंवर १०० टक्के आयातशूल्क (टॅरिफ) लादण्याची घोषणा त्यांनी केली आहे.अमेरिकेत निर्माण केलेल्या क्रिटिकल सॉफ्टवेअरवरही कठोर नियंत्रणे आणण्याची योजना त्यांच्याकडून जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयानंतर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला लक्ष्य केल्याचे तसेच अमेरिका-चीन व्यापार युद्ध पुन्हा सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे.

### घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडताहेत

शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू आम्ही पाहिले आणि त्यावेळेस आम्ही ठरवलं की शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ राहायचं. म्हणून आम्ही एनडीआरएफचे निकष असतील, अटीशर्ती असतील त्या सर्व बाजूला ठेऊन मोठ्या प्रमाणात भरीव देण्याचं ठरवलं. शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्याचं काम आम्ही केलं याच मला समाधान आहे.

आम्ही ३२ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं, आम्ही म्हणालो होतो की, शेतकऱ्यांची दिवाळी आम्ही काळी होऊन देणार नाही, दिवाळी पूर्वी त्यांच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले आहेत. आम्ही ४७ हजार हेक्टरी मदत केली, जमीन खरडून गेलेल्या लोकांना पुन्हा मनरेगाच्या माध्यमातून ३ लाख रुपये हेक्टरी असे ३ लाख ४७ हजार रुपये मदत केली. आतापर्यंतच्या इतिहासात इतकी मदत शेतकऱ्याला कधीच मिळाली नव्हती.

शेतकऱ्यांची चिंता आम्ही मिटवली. हे करत आहेत ते निव्वळ राजकारण आहे. तुम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर जाताना शेतकऱ्याच्या पोराच्या डोळ्यातले अश्रू पाहून त्याच्या हातात बिस्कीटचा पुडा तरी ठेवला का? आम्ही मोठं मोठे किट पाठवले, त्यांचा दसरा चांगला झाला, दिवाळी ही त्यांची चांगली होईल हे आम्ही पाहिलं. हा कसला हंबरडा मोर्चा? हे उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडायला लागलेत. सत्ता गेली तेव्हा हंबरडा फोडला, खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला. हे पुतणा-मावशीचं प्रेम आहे, हे निव्वळ शेतकऱ्यांच्या नावावर केलेले राजकारण आहे.

# तुकडाबंदी अधिनियमात सुधारणेस सरकारी मंजुरी

## लहान भूखंडधारकांना दिलासा

**मुंबई :** राज्यातील लहान भूखंडधारकांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत म हाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ (तुकडाबंदी अधिनियम) याम ध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमिनीच्या तुकड्यांच्या व्यवहारांवरील मर्यादा काही प्रमाणात शिथिल होणार आहे. १९४७ मध्ये लागू करण्यात आलेल्या या अधिनियम ानुसार, शेतीसाठी असलेल्या जमिनीचे ठरावीक मर्यादेपेक्षा लहान तुकडे करता येत नाहीत. यामागचा उद्देश म्हणजे शेतीयोग्य जमीन टिकवून ठेवणे आणि अत्यंत छोट्या तुकड्यांमुळे निर्माण होणाऱ्या अकार्यक्षम शेतीपासून बचाव करणे. कलम ८ (ब) चे पंथ वगळण्यात आले असून, कलम ९ मध्ये 'पोट कलम (३) नंतर परतुक' समाविष्ट करण्यात आले आहे. या सुधारणा केल्याने जमिनीचे व्यवहार, विभाजन आणि त्यावरील विक्री व्यवहार यांना कायदेशीर स्पष्टता मिळणार आहे. जमि नीचे तुकडे करण्यावर लावलेली काही निर्बंधे हटवून, वास्तव परिस्थितीला अनुसरून अधिक लवचिक धोरण आखले जाणार आहे.

या निर्णयाचे महत्त्व व परिणाम १. छोट्या भूखंडधारकांना दिलासा वारसा हक्कानुसार जमीन लहान तुकड्यांमध्ये विभागली गेली असून, त्या तुकड्यांवर व्यवहार करताना अनेक अडचणी येत होत्या. आता त्यावर तोडगा निघणार.

२. बांधकाम व विकास प्रकल्पांना चालना लहान भूखंडांवर बांधकाम करता येत नसल्याने अनेक विकास प्रकल्प रखडले होते. सुधारित अधिनियमानंतर अशा प्रकल्पांना संजीवनी मिळू शकते.

३. शेती, उद्योग व नागरी विकासात गतिमानता जमिनीच्या एकत्रीकरणासाठी प्रक्रिया सुलभहोणार.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
